| | |
|---|---|
| स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५० | **महाराष्ट्र शासन**<br>**समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.**<br>**३ चर्च पथ,पुणे-४११००१**<br>दूरध्वनी क्र .020-26122752 ईमेल –sakalyanpuneest@gmail.com |
| **संदर्भ:** | १.शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रसकआ २००१/प्रक्र २५१/ आस्था-२ दिनांक २७ फेब्रुवारी २००४<br>२.सामान्य प्रशासन विभाग शासन पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्रक्र३१२A/१६-ब दि.२९.१२. २०१७<br>३.दिनांक २०.०१.२०२५ रोजी झालेली विभागीय पदोन्नती समितीची बैठक. |

जा.क्र.सकआ/आस्था-५/सकनि ते गृहपाल/पदोन्नती/२०२४-२५/का-६/ ३९५ पुणे दि. ०५/०२/२०२५

# आदेश

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आस्थापनेवरील असलेल्या पदांचा आढावा वित्त विभागाच्या उच्चस्तरीय समितीने घेतला असून उपोद्घातातील संदर्भ क्र. २ च्या शासन पत्रान्वये खुल्या प्रवर्गातील पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. संदर्भीय दिनांक २०.०१.२०२५ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार **समाज कल्याण निरीक्षक** यांना **गृहपाल** या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. सबब, आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य,पुणे हे पदोन्नती समितीने घेतलेल्या निर्णयानुसार " **समाज कल्याण निरीक्षक** संवर्गातून एस-१३(३५४००-११२४००) वेतनश्रेणी मधून एस-१४ (३८६००-१२२८००) या सुधारित वेतनश्रेणीतील " **गृहपाल** " या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापनेचे आदेश निर्गमित करीत आहेत.

| **अ. क्र** | **समाज कल्याण निरीक्षकाचे नांव व सध्याचे कार्यालय** | **जातीचा मुळ प्रवर्ग** | **पदोन्नतीने पदस्थापनेचे कार्यालय** |
|---|---|---|---|
| १ | **श्री.रविंद्र ईश्वर कुमठेकर,**<br>सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण रत्नागिरी | खुला | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह,जेलरोड,रत्नागिरी** येथील गृहपाल या पदावर विनंती व पदोन्नतीने पदस्थापना |
| २ | **श्री. आशिष शिवाजीराव शिंदे,**<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,सातारा | खुला | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह,कोरेगाव जि.सातारा** येथील गृहपाल या पदावर विनंती व पदोन्नतीने पदस्थापना |

| अ. क्र | समाज कल्याण निरीक्षकाचे नांव व सध्याचे कार्यालय | जातीचा मुळ प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|
| ३ | **श्रीमती पंचशिला चंद्रकांत खंडाईत,** सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण सातारा | अ.जाती | **१२५ वी जयंती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह (नवीन),गोडोली,सातारा** येथील गृहपाल या पदावर विनंती व पदोन्नतीने पदस्थापना |
| ४ | **श्री.शिवराम नथुजी बारई,** जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,भंडारा | इ.मा.व (तेली) | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह,तुमसर जि.भंडारा** येथील गृहपाल या पदावर विनंती व पदोन्नतीने पदस्थापना |
| ५ | **श्री.अशोक सखाराम मगर,** सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव | खुला | **अनु.जाती व नवबौध्द घटकातील मुलांची शासकीय निवासी शाळा,गोलेगाव ता.भूम जि. धाराशिव** येथील गृहपाल या पदावर विनंती व पदोन्नतीने पदस्थापना |
| ६ | **श्री .सदानंद पांडुरंग बगाडे,** सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कोल्हापुर | इमाव | **अनु.जाती व नवबौध्द घटकातील मुलांची शासकीय निवासी शाळा,राधानगरी जि. कोल्हापुर** येथील गृहपाल या पदावर विनंती व पदोन्नतीने पदस्थापना |

उपरोक्त नमूद समाज कल्याण निरीक्षक यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे गृहपाल या पदावर खालील अटींच्या अधिन राहून पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

१. मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे. सदरची पदोन्नती ही वरील न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

२. उपरोक्त कर्मचा-यांनी पदोन्नतीच्या पदावर हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांचे आत रुजू व्हावे, अन्यथा या कालावधीत रुजू न झाल्यास संबधीत कर्मचा-यांना पदोन्नतीचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच पदोन्नतीच्या पदावर रुजू न झाल्यास / पदोन्नती नाकारल्यास त्यांनी तात्काळ त्यांचे कार्यालयामार्फत आयुक्तालयास कळविण्यांत यावे व सदरहू आदेशान्वये पदोन्नती नाकारल्याची नोंद कार्यालय प्रमुख यांनी संबंधित कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तकात घ्यावी.

३. ज्या कर्मचा-यांना कालबध्द/आश्वासित प्रगती योजनेचा फायदा मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचा-यांनी त्वरीत पदावर रुजू व्हावे. त्यांनी पदोन्नती नाकारल्यास अथवा विहीत मुदतीत रुजू न झाल्यास त्याचे फायदे आपोआपच रद्य होतील.

४. पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्यानंतर वेतन निश्चितीच्या दृष्टीने एक महिन्याचे आत विकल्प देणे बंधनकारक राहील.तसे विकल्प न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र. ११ (१)(ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

५. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/प्रक्र ३०३/का-१२ दिनांक १२.९.२०१६ नुसार पदोन्नती नाकारल्यास त्याचा तिसऱ्या वर्षी पदोन्नतीसाठी विचार केला जाईल.

६. संबधीत कार्यालयप्रमुख यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-याकडील कार्यभार अन्य कर्मचा-यांकडे सोपवून त्यांना तात्काळ पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे व कार्यमुक्त / रुजू अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुखांनी आयुक्तालयास त्वरीत सादर करावा.

७. संबंधितांची पदस्थापना ही पसंती क्रमानुसार तसेच स्वखुशीने नमूद केलेल्या विकल्पाच्या ठिकाणी देण्यात आलेली असल्याने संबंधिताना कोणत्याही प्रकारचा बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय नाही.

05.02.25

**(ओमप्रकाश बकोरिया)**
**आयुक्त, समाज कल्याण**
**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर :-**

१. मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२.
२. मा.महालेखापाल, मुंबई / नागपूर .
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (संबंधित)

**प्रत :- माहितीस्तव तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-**

१. अतिरिक्त आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग (संबंधित)
३. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (संबंधित)
४. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जि.प. (संबंधित)
५. कोषागार अधिकारी (संबंधित)
६. संबंधित कर्मचारी
७. आस्थापना सर्व प्रभाग/आ.न. /वै. न.